# शास्त्रीय मधुमक्षिकापालन प्रशिक्षण

बारामती येथील जैवतंत्रज्ञान संस्थेच्या सेंटर ऑफ एक्सेलेंस इन एपिकल्चरल बायोटेक्नॉलॉजी यांना नॅशनल बी बोर्ड, भारत सरकार, नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त आहे. त्याअंतर्गत विविध मधमाशापालन प्रशिक्षण, संशोधन व विकास कार्यक्रम राबविण्यात येतात.

सदर ७ दिवसीय मधमाशापालन प्रशिक्षण कार्यक्रम दि. २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर, २०१५ विद्या प्रतिष्टान स्कुल ऑफ बायोटेक्नॉलॉजी, (व्हीएसबीटी) येथे आयोजित केला आहे. शेतकरी, मधपाळ, महिला, शासकिय कर्मचारी, सामाजिक संस्था व इतर या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होवू शकतात. सदर प्रशिक्षणा दरम्यान संबंधीत प्रात्यक्षिके, वसाहत हाताळणे व निरीक्षण, दृक—श्राव्य माध्यमाद्वारे अनुभवी व तंज्ञाचे मार्गदर्शन प्राप्त होईल. सदर प्रशिक्षणात मधमाशापालनासंबंधी खालील विषयांचा समावेश असेल.

मधमाशांचे प्रकार, जीवशास्त्र व स्वभाव, मधमाशापालनाच्या पद्धती व त्या उद्योगाची स्थिती, वनस्पती—पुष्प व मधमाशांचे संबंध, मधुवनाची निवड व वसाहतींचे दैनंदिन निरीक्षण, भारतीय मानकांप्रमाणे मधमाशांच्या वसाहतींसाठी लागणाऱ्या पेटया, अवजारे व उपकरणे, विशेष व्यवस्थापनाद्वारे वसाहत वाढ, राणी पैदास, ऋतूमानाप्रमाणे नियोजन, वसाहतींचे रोग, शत्रु, किटकनाशके व रासायनिक द्रव्यापासून संरक्षण, मधमाशांच्या परागीभवनाद्वारे शेती व फलोद्यान उत्पादनात वाढ, मध, मेण, पराग व अन्य मौल्यवान पदार्थाचे उत्पादन, प्रशोधन, गुणवत्ता नियंत्रण, पणन व निर्यात, मधमाशापालन व जैवविविधताद्वारे शाश्वत विकास, मधमाशापालनाचे अर्थशास्त्र, SWOT, शासकिय व अशासकिय संस्थाद्वारे मधमाशापालनाच्या योजना व कार्य इत्यादी.

सदर प्रशिक्षणासाठी प्रवेश विनामुल्य आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या प्रशिक्षणार्थीच्या राहण्याची व भोजनाची सोय करण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संपर्क: ०२११२ २३९३८६, ८८ श्री. विवेक खालोकार: मो. ९५६११३३३११

नाव नोंदणीची अंतिम दिंनाक २३ ऑक्टोबर, २०१५.